## निशाणी क्रमांक ३० वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. २ व ५ यांनी वादीच्या दाव्यास कैफियत/म्हणणे दाखल करण्यास झालेला विलंब माफ होऊन विना म्हणणे व कैफियतीचा आदेश रद्द होवून मिळणेकरीता केलेला आहे.

२. प्रस्तुत अर्जास वादीने म्हणणे दाखल करुन आक्षेप दर्शविला आहे.

३. प्रतिवादींच्या मते, वादीने प्रतिवादींविरूध्द वाटपाचा दावा व तुर्तातुर्त ताकीदीचा नि.क्र. ५ दाखल केलेला आहे. प्रतिवादी हे दाव्यात हजर असून सदर दाव्यातील कागदपत्रे, फेरफार उतारे वेळेत उपलब्ध झालेली नाही. तसेच, प्रतिवादी क्र. २ हे वयस्कर असलेने आणि प्रतिवादी क्र. ५ हे कामानिमित्त परगावी राहत असलेने त्यांना वेळेत मे. न्यायालयात हजर राहून आपले म्हणणे व कैफियत दाखल करता आले नाही. वाद मिळकतीमध्ये प्रतिवादींचे मौलिक हक्क गुंतले असल्याने न्यायाच्या दृष्टीने विना म्हणणे/कैफियतचा आदेश रद्द होऊन त्यांची कैफियत प्रस्तुत कामी दाखल करुन घेणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रतिवादींनी प्रस्तुतचा अर्ज कैफियत देण्यास झालेला विलंब माफ होवून त्यांचेविरूध्द झालेला विना म्हणणे व कैफियतीचा आदेश रद्द होवून कैफियत दाखल करणेस परवानगी मिळणेसाठी केलेला आहे.

४. वादीने प्रस्तुत अर्जावर आपले म्हणणे देवून योग्य ते न्यायाचे आदेश व्हावेत अशी विनंती केलेली आहे.

५. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा वाटपासाठी व प्रत्यक्ष कब्जा मिळणेसाठी दाखल केला आहे, प्रस्तुत दाव्यामध्ये स्थावर मालमत्तेचा समावेश असून, स्थावर मालमत्ते अनुषंगानेच दाद मागितली आहे. सदर प्रतिवादींना दाव्याकामी मुदतीत कैफियत दाखल करता आले नाही असे कथन केले आहे. सबब एकूणच परिस्थिती पाहता व प्रस्तुत दाव्यातील स्थावर मिळकतीचा समावेश पाहता, न्यायाचे कारणास्तव प्रस्तुत प्रतिवादी यांना संधी देणे आवश्यक वाटते. प्रस्तुत प्रतिवादींना न्यायाचे कारणास्तव संधी दिली नाही तर न्यायालयीन कामकाजाचे बाहुल्य वाढणार आहे व त्यांच्या न्याय हक्कावर गदा येणार आहे. सबब, न्यायाचे तत्व विचारात घेता, प्रस्तुत दाव्याचा निकाल गुणदोषावर करण्यासाठी प्रतिवादींना कैफियत दाखल करण्याची संधी देणे आवश्यक वाटते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आ दे श

१. प्रस्तुतचा अर्ज एकूण रक्कम रु. २००/- खर्चाने मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र. २ व ५ यांनी खर्चाची रक्कम वादीस पुढील तारखेस देण्याची आहे.

३. प्रतिवादींनी पुढील तारखेस खर्चाची रक्कम देण्यास कसूर केले तर प्रस्तुतचा आदेश आपोआप रद्द होईल.

४. दोन्ही पक्षांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

ANIL SAHEBRAO SONWALKAR

Digitally signed by ANIL SAHEBRAO SONWALKAR
Date: 2024.10.19 17:21:43 +0530

( ए. एस. सोनवलकर )

दिनांकः-१९/१०/२०२४. ५ वे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
पंढरपूर.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | - | M. P. Gheradi. |
| Court | - | 5th Jt. CJJD & JMFC, Pandharpur. |
| Date of Judgment/Order | - | 19/10/2024 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | - | 19/10/2024 |
| Judgment/Order uploaded on | - | 19/10/2024 |